# 'बंबई के कौए'चा १५ मे रोजी रौप्यमहोत्सव.

शफाअत खान हे नाव आता मराठी रंगभूमीला, विशेषतः प्रायोगिक रंगभूमीला चांगलेच परिचित झाले आहे. त्यांच्या लेखनाची तिरकस शैली प्रेक्षकवर्ग आणि समीक्षकवर्गाने गंभीरपणे स्वीकारली आहे. विनोदी अंगाने प्रस्थापितांवर, कालबाह्यतेवर, सांकेतिकतेवर, नवतेतल्या सोंगाढोंगांवर टोले मारणारे शफाअत खान आजच्या पिढीचे आघाडीचे नाटककार आहेत.

काही वर्षांपूर्वी त्यांनी 'मुंबईचे कावळे' हे नाटक लिहिले होते. जे पुन्हा एकदा खास हिंदी प्रयोगासाठी त्यांनी पुर्नलेखन करून व अनुवाद करून हिंदी रंगभूमीवर सादर करण्यासाठी तरुण दिग्दर्शक भूपेंद्र देशमुख यांना दिले. जे 'आलाप' या संस्थेने सादर केले... अगदी थोड्याच काळात त्या हिंदी रूपांतराचे पंचवीस प्रयोग होत आहेत, ही निश्चितच स्वागतार्ह बाब आहे. दि. १५ मे रोजी सायंकाळी ६ वाजता आणि ९ वाजता 'बंबई के कौए' या नाटकाचा २५ वा प्रयोग पृथ्वी थिएटर येथे सादर होणार आहे.

हे नाटक विनोदी अंगाने, हास्यास्पद अनुभवांवर... परंपरागत चालत आलेल्या पोकळ खोट्या विश्वासावर... तसंच भ्रष्टाचार, लाचलुचपत आणि स्वार्थी उद्देशांवर शेरे मारत पुढे-पुढे जाणारं आहे. पुरात मेलेल्या गावकऱ्यांच्या नातेवाईकांच्या पिंडदानाच्या कार्यक्रमासाठी आवश्यक ते कावळे गावात नसल्याने गावकरी समाजसेवकांना बाकी सगळी कामं सोडून कावळ्यांच्या शोधात वणवण करायला लावतात आणि मग त्या समाजसेवकांचा कावळ्यांचा शोध त्यांना थेट मुंबईपर्यंत पोहचवतो. एका बाजूला विनोदाच्या सहाय्याने प्रसंगांवर आघात करून सामाजिक आणि रायकीय मतांवर हल्ला चढवून, दुसऱ्या बाजूने अर्थहीन ध्येयांवर एकमेकांना समजून घेण्यातली तफावत दाखवून देण्याचा प्रयत्न या नाटकात जाणवतो.

प्रयोग अधिकाधिक रंजक करण्याच्या दिग्दर्शक भूपेंद्र देशमुख यांच्या प्रयत्नांना रंगभूमीवरील आघाडीचे अभिनेते गणेश यादव, किशोर कदम, नीलेश पांडे, दिनकर गावंडे, दीपक देशमुख, हेमंत प्रभु, उदय देशमुख, नंदू माधव, मकरंद पांडे, मंदार वैद्य, अनंत चव्हाण, विश्वनाथ सावंत, गिरीश महाजन, मंगेश पाथरे, किशोर महामुणकर यांनी चांगली साथ दिली आहे, राहुल रानडे यांनी या नाटकाला सळसळतं संगीत दिलं आहे.

एकूण या सळसळत्या संगीत- नृत्य-नाट्यमय धमाल उडवणाऱ्या आणि चिंतन करायला लावणाऱ्या नाटकाचे लवकरात लवकर २५ प्रयोग होणे ही प्रायोगिक रंगभूमीवरील आशादायी बाब आहे.



'बंबई के कौए'मधील एका प्रसंगात गणेश यादव, नंदू माधव आणि इतर कलावंत दिसत आहेत.

# एक राजकीय विडंबन नाट्य 'बंबई के कौवे'

'आलाप' या संस्थेच्या 'बंबई के कव्वे' या हिंदी नाटकाचा २५ वा (रौप्य महोत्सवी) प्रयोग अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत सादर करण्यात आला. हे नाटक काही वर्षांपूर्वी 'मुंबईचे कावळे' या नावाने रंगमंच्यावर आलं होतं. तेव्हा या नाटकाचा पूर्णबाज तमाशा-प्रधान होता. शफात खान यांच्या या नाटकाचे तेव्हा फारसे प्रयोग झाले नाहीत. हिंदीत हे नाटक आणताना या नाटकाचे दिग्दर्शक भूपेन देशमुख यांच्याशी चर्चा करून त्यांनी या नाटकाचं पुनर्लेखन करून त्यामध्ये बरेच बदल केले आहेत.

या नाटकाचं कथानक तसं आपल्या परिचयाचं आहे. एका गावात पूर येतो. त्यामध्ये बरीच मनुष्यहानी आणि मालमत्तेचं नुकसान होतं. साहजिकच मदतकार्य सुरू होतं. सरकारी, सामाजिक संस्था तसंच परकीय मदतीचा ओघही चालू असतो. हे काम चालू असताना त्यामध्ये दिसून येतो सरकारी यंत्रणेतील गलथानपणा. नोकरशाहीतील अधिकाऱ्यांचा आणि राजकीय पुढाऱ्यांचा उद्दामपणा. त्याचबरोबर दिसून येते ती गावकऱ्यांची उदासिनता, निष्क्रियता आणि नको त्या गोष्टीला महत्त्व देणं ही सवय. पूर आल्यावर इतर अनेक महत्त्वाचे प्रश्न असताना या गावातील लोक पिंडदानासाठी कावळा मिळत नाही म्हणून कासाविस होतात. पुरामुळे झाडं वाहून गेलेली. त्यामुळे गावात आणि आजूबाजूच्या परिसरात एकही कावळा दिसत नाही, म्हणून मग समाजकार्य करायला आलेली मंडळी मुंबईहून कावळे आणायची योजना आखतात. या कावळे प्रकरणामुळे सरकार कोसळण्याची परिस्थिती निर्माण होते. विरोधी पक्ष या गोष्टीचं भांडवल करून सरकारला अडचणीत आणतो तेव्हा राज्याचे मुख्यमंत्री मुंबईहून विमानाने चार कावळे पाठवायची व्यवस्था करतात. पण विमानाचं अपहरण झाल्यामुळे गावात कावळे वेळेवर पोहोचू शकत नाहीत.



'बंबई के कौवे' या नाटकात गणेश यादव, निलेश पांढे आणि नंदू माधव

अशाप्रकारे आजच्या राजकीय, सामाजिक परिस्थितीवर व्यंगात्मक पद्धतीने भाष्य करीत हे नाटक आपल्याला हसवता हसवता विचार करायला लावतं. माणसं आयुष्यात नको त्या गोष्टीच्या मागे धावत असतात व ती मिळाली नाही की दुःखी होतात हेही या नाटकातून नाटककाराने सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

दिग्दर्शक भूपेन देशमुख यांनी हे नाटक अतिशय वेगळ्या पद्धतीने बसवलं आहे. त्यांनी त्यामध्ये लोकनाट्याच्या शैलीचा वापर केला आहे. पण त्याचा अतिरेक होऊ दिलेला नाही.

हिंदी भाषेत करण्यासाठी हेच नाटक आपण का निवडले, या प्रश्नावर ते म्हणाले, "आजच्या काळाशी या नाटकाचं साधर्म्य वाटतं. तसंच काळानुसार हवे तसे बदलही या नाटकात करता येतात. या नाटकाचा फॉर्मही त्याच्या आशयाला अनुरूप असा आहे." या नाटकातील हिंदी गाणी किशोर कदम यांनी लिहिली आहेत. राहुल रानडेंचं संगीत नाटकाला पोषक असून नाटकाची गती वाढवण्यास मदत करतं. यातील सर्व कलावंतांनी चांगली कामं केली आहेत. विशेषतः नंदू माधव, गणेश यादव व निलेश पांढे यांच्या प्रमुख भूमिका अप्रतिम झाल्या आहेत. तिघांनीही आपल्या अभिनयाचे विविध पैलू अनेक बारकाव्यानीशी पेश केले.

दिल्लीला अनेक वर्षं राहिलेले रमेश रणदिवे हे पती/पत्नी हे नाटक पाहायला आले होते. त्यांना या नाटकाविषयी विचारलं. रणदिवे म्हणाले, "एखादं तरी स्त्री पात्र या नाटकात असायला हवं होतं कारण राजकारणात अनेक स्त्रियांचा सहभाग असतो हे दिल्लीत राहून आम्ही पाहिलेलं आहे." अशाप्रकारची प्रयोगिक हिंदी नाटकं अमराठी प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्याचा 'आलाप' या संस्थेचा हा उपक्रम योग्य असाच आहे.

■ सुरेश चव्हाण